पीएच.डी

संशोधन आराखडा

“लातूर जिल्ह्यातील डाळ उद्योगधंद्याचा भौगोलिक अभ्यास”

सामाजिक शास्त्रे शाखेअंतर्गत, भूगोल विषयातील पीएच.डी (विद्या वाचस्पती) या पदवीकरीता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

-: संशोधक :-

पाटील गजानन हणमंतराव

(एम.ए.बी.एड्)

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

-: मार्गदर्शक :-

प्रा.डॉ.धनुश्वर रमेश शामराव

(एम.ए.बी.एड् पीएच.डी)

भूगोल विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकुर

ता.चाकुर जि.लातूर

-: भूगोल संशोधन केंद्र :-

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

--- डिसेंबर 2014 ---

“लातूर जिल्ह्यातील डाळ उद्योगधंद्याचा भौगोलिक अभ्यास”

प्रस्तावना :-(Introduction)

कृषी म्हणजे नांगरणे यापासून **‘कृषी’** हा शब्द निर्माण झालेला आहे. कृषी म्हणजे जमिन नांगरणे आणि त्यात पीके घेणे यापुरता मर्यादीत नाही. तर त्याचा व्याप खूप विस्तृत आहे मानव स्वतःच्या फायद्यासाठी ज्यांच्यापासून विविध उत्पादने घेतो त्या सर्व प्रक्रियांचा समावेश **‘कृषी’** मध्ये होतो. त्या सर्व प्रक्रियांचा समावेश **‘कृषी’** मध्ये होतो. पिके आणि प्राणिज उत्पादन प्रक्रिया त्यांचे वितरण उपयोगिता यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणाऱ्या शास्त्रास ‘कृषीशास्त्र’ असे म्हणतात.

जगातील अन्य व्यवसायापेक्षा ‘कृषी’ हा व्यवसाय खूप प्राचीन आहे. कारण शेतीला नव अश्मयुगात सुरूवात झाली असे मानले जाते. नव अश्मयुगाचा काल इ.स. पूर्व 10,000 वर्षाचा मानला जातो तत्पुर्वी मानव रानटी अवस्थेत होता. हळूहळू वैदीककाळ, बौध्दकाळ, मध्ययुगीन काळ व हरितक्रांतीचा कालखंड या टप्प्याने कृषीचा विकास होत आलेला आहे.

वाढत्या लोकसंख्येबरोबरच आणि प्रगतीबरोबरचं डाळ व डाळ पिकांपासून मिळणाऱ्या पदार्थाची मागणी आणि महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. डाळीमध्ये प्रथिने व कॅलरीज मोठयाप्रमाणात असतात त्यामुळे मानवी अहारात डाळीचे महत्त्व जास्त आहे. डाळवर्गीय पीकांमध्ये, तूर, हरभरा, मूग, उडीद, मसुर, वटाणा इ. डाळपीके महत्त्वाची आहेत. यामुळे डाळीचे मोठयाप्रमाणावर उत्पादन घेतले जाते. महाराष्ट्र हा डाळवर्गीय पिकांच्या उत्पादनाच्या बाबतीत एक महत्त्वपूर्ण राज्य म्हणून ओळखले जाते. प्रामुख्याने महाराष्ट्रात 1960-61 साली डाळीचे उत्पन्न व आजचे उत्पन्न यात खूप फरक पडलेला आहे.

महाराष्ट्रातील डाळपीकांचे क्षेत्र हे मराठवाडयात सर्वाधीक असून कोकण या विभागात ते सर्वात कमी आहे. म्हणून डाळ या उद्योगाचे मराठवाडा, प.महाराष्ट्र व खानदेशात वितरण झालेले आहे. लातूर जिल्हयाच्या अर्थव्यवस्थेत कृषीचे महत्त्व लक्षात घेवून जिल्हयाच्या विकासामध्ये डाळ उत्पादनाची मदत कशाप्रकारे झालेली आहे यांचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात केला जाणार आहे.

अभ्यास क्षेत्र (Study Area)

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी मराठवाडा विभागातील लातूर जिल्हा निवडलेला आहे. भौगोलिकदृष्टया लातूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी येतो. लातूर जिल्हयाचा अक्षवृत्तीय विस्तार$18^0$05’ ते $18^0$07’ उत्तर अक्षवृत्त व रेखावृत्तीय विस्तार $73^0$25’ ते $77^0$25’ पूर्वे रेखावृत्ताच्या दरम्यान आहे.

जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर परभणी, हिंगोली तर पूर्वेस नांदेड, दक्षिणेस कर्नाटक राज्याची सीमा तर पश्चिमेस उस्मानाबाद जिल्हा, वायव्येस बीड जिल्ह्याची सीमा आहे

लातूर जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ 7157 चौ.कि.मी. आहे. जनगणना 2011 नुसार लातूर जिल्ह्याची एकुण लोकसंख्या 24,55,543 इतकी आहे, प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने लातूर जिल्ह्यात लातूर, उदगीर, अहमदपूर, शिरूर अनंतपाळ, देवणी, जळकोट, चाकुर, निलंगा, औसा असे एकुण दहा तालुक्यांचा समावेश होतो.

गृहीतके (Hypothesis)

सदरिल संशोधन करीत असतांना पुढील गृहितके निश्चित केलेली आहेत.

1) डाळ उद्योग विकसीत होण्यासाठी अनुकूल भौगोलिक परिस्थिती लातूर जिल्ह्यात आहे.

2) लातूर जिल्ह्यात डाळ उत्पादन मोठया प्रमाणात होते त्यामुळे लातूर जिल्हयात डाळ उद्योगधंदे स्थापन झाले आहेत.

3) डाळ उद्योगांमुळे शेती क्षेत्रात झालेले बदल त्याअनुषंगाने, सामाजिक, आर्थिक, व्यापरक्षेत्रात बहुतांश प्रमाणात बदल झालेले आहेत.

4) लातूर जिल्ह्यातील शेतीवर अधारीत डाळ उद्योगांमुळे कृषी क्षेत्रांच्या विकासाला चालाना मिळाली आहे.

उद्दिष्टे :- (Objectives)

सदरिल संशोधन कार्यासाठी पुढील उद्दिष्टये निश्चित केलली आहेत.

1) लातूर जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती व शेती यांच्यातील परस्पर संबंधाविषयी अवलोकन करणे

2) लातूर जिल्ह्यातील डाळ उत्पादन व डाळ उद्योग यांचे अवलोकन करणे

3) डाळ उत्पादनाविषयी शेतकऱ्यांची भूमिका जाणून घेणे

4) डाळ उद्योगांच्या व बाजारपेठेविषयी उद्योजकांच्या भूमिकेचे अवलोकन करणे

5) डाळ उद्योग धंद्याचे व्यवस्थापन, शेती व उद्योगधंदयाविषयी शासकीय धोरणांचे अवलोकन करणे.

आकडेवारीचे संकलन (Data collection)

1) लातूर जिल्हा-सामाजिक व अर्थिक समालोचन

2) जनगणना अहवाल

3) कृषी सांख्यिकीय विभाग पुणे

4) जिल्हा सांख्यिकीय विभाग

5) जिल्हा कृषी कार्यालय

5) सर्वेक्षण प्रश्नावली पध्दत व मुलाखती तंत्र

वरील घटकांना अनुसरून हा अभ्यास प्राथमिक व दुय्यम आकडेवारीवर आधारित आहे. प्राथमिक स्वरूपाची माहिती महाराष्ट्र शासन प्रकाशित माहिती आणि डाळ उद्योगाची मासिके तसेच मुलाखती आणि अधिकारी यांच्याकडून चर्चेच्या आधारे घेतली जाणार आहे.

दुय्यम स्वरूपाची माहिती ही सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना अहवाल, जिल्हा सांख्यिकीय विभाग व कृषी कार्यालयाकडून संकलीत करण्यात येणार आहे.

अभ्यास पध्दती (Methodology)

लातूर जिल्ह्यातील डाळबिया पीक प्रारूप, पिक केंद्रीकरण, पीक विविधता, पिक संयोग अभ्यासण्यासाठी भाटीया, व्हिवर, जसबीरसिंग, डी.थॉमस यांच्या पध्दतीचा वापर केला जाणार आहे.

लातूर जिल्ह्यातील डाळउद्योग विकासासाठी पीक प्रारूप योग्य की अयोग्य आहे हे ठरवण्यासाठी भारतीय कृषी खात्याने सूचविलेल्या सुत्रांचा वापर करण्यात येणार आहे.

1) पीक प्रारूप (Cropping pattern)

सुत्र :- $Cp = \frac{Ca}{N} x100$

स्पष्टीकरण : Cp = पीक प्रारूप Ca = अभ्यास क्षेत्रातील a पिकाखालील क्षेत्र

N = अभ्यासासाठी निवडलेल्या प्रदेशातील एकुण पिकाखाली क्षेत्र

2) पीक केंद्रीकरण (Crop Concenteration)

लातूर जिल्हयातील पीक केंद्रीकरण ठरविण्यासाठी जसबीर सिंग यांच्या सुत्रांचा वापर करण्यात येणार आहे

सुत्र : $Ci = \frac{Pae}{Par} x\ 100$

स्पष्टीकरण : Ci = पिक केंद्रीकरण निर्देशांक

Pae = अभ्यासाकरिता निडलेल्या क्षेत्रतील अ पिकांचे एकुण हंगामाखालील क्षेत्रापैकी शेकडा प्रमाण

Par = अ पिकांचे संपूर्ण प्रदेशातील हंगामाखालील क्षेत्रांशी असलेले शेकडा प्रमाण

3) पिक संयोग (Crop Combination)

लातूर जिल्हयातील पीक संयोग काढण्यासाठी व्हिवर, रफीउल्लाह यांच्या सुत्रांचा वापर करण्यात येणार आहे

व्हिवर यांचे सुत्र : $d = \frac{Ed^2}{N}$

स्पष्टीकरण : - d = विचलन

d^2 = विचलनाचा वर्ग

n = पिकांची संख्या

रफीउल्लाह यांचे सुत्र :- $d = \frac{^{Ed^2}p - d^2n}{N}$

स्पष्टीकरण : d = विचलन

dp = धनात्मक विचलन

dn = ऋणात्मक विचलन

N = पिकांची संख्या

4) पिक विविधता (Crop Diversification)

लतूर जिल्ह्यातील पिक विविधता काढण्यासाठी भाटीया यांच्या सुत्रचा वापर करण्यात येणार आहे.

सुत्र :

पीक विविधता निर्देशांक = $\frac{\text{एकुण पिकाखालील क्षेत्रापैकी x पिकाखालील क्षेत्र (टक्केवारीमध्ये)}}{\text{x पिकांची संख्या}}$

सदर संशोधनात प्राप्त झालेल्या माहीतीचे विश्लेषण करण्यासाठी तक्ते, नकाशे, आलेख, विभाजीत वर्तुळ यापध्दतींचा वापर करण्यात येणार आहे.

विषयाची निवड (Choice of Topic)

लातूर जिल्हा महाराष्ट्रातील कृषी उत्पादनात अग्रेसर जिल्हा असून तो कृषीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा प्रयोग करण्यात प्रसिध्द आहे. या जिल्हयामध्ये शेतीची वैशिष्टये विभागानुसार वेगवेगळी पहावयास मिळतात.

शेतकऱ्यांकडून जास्ती जास्त प्रमाणात कृषी उत्पादन वाढविण्यसाठी जलसिंचन क्षेत्रामध्ये वाढ व आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास झालेला पहावयास मिळतो हे शास्त्रीय दृष्टया अभ्यासण्यासाठी या विषयाची निवड केलेली आहे.

जिल्ह्यातील डाळवर्गीय पिकांचे उत्पादन वाढल्याने वेगवेगळया भागात डाळमिल्स उदयोगधंदयांची स्थापना करण्यात आली आहे. वरिल सर्व घटकांमूळे प्रोत्साहित होवून मी संशोधनासाठी ''लातूर जिल्हयातील डाळ उद्योगधंद्याचा भौगोलिक अभ्यास'' या विषयाची निवड केलेली आहे.

साहित्याचे पुनरावलोकन (Review of Literature)

कृषीवर आधारित डाळ उद्योगासंबधी पूर्वी आलेल्या संशोधनाचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात येणार आहे.

1) जाधव पी.ए (1984) :-

यांनी सातारा जिल्ह्यातील कृषी आधारित अद्योगधंदयाचा अभ्यास या विषयावर संशोधन केले असून त्यांनी साखर कारखाने, सुतगिरण्या यांचा 1951 ते 1981 या कालावधीतील माहिती गोळा करून साखर कारखाण्याचा पिक पध्दतीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास केलेला आहे.

2) संदिप सिंह (1995)

यांनी भारतीय ग्रामीण उद्योगधंद्याची रचना, फायदे, तोटे : एक अभ्यास या विषयावर संशोधन केले असून त्यांनी ग्रामीण भागातील उद्योगधंदयास येणाऱ्या अडचणी जसे, आर्थिक, कच्चामाल, विजेची कमतरता, अकुशल कर्मचारी, तंत्रज्ञानाचा अभ्यास, बाजारपेठ व माहितीचा अभाव इत्यादी विषयी निष्कर्ष काढून शिफारशी सुचविलेल्या आहेत.

3) मुरूगल एम (1996)

प्रक्रिया, उपयुक्तता व निर्यात : बाजारपेठेच्या दृष्टिकोनातून एक चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन केले आहे.

प्रकरण मांडणी :-

1) प्रकरण पहिले :- संकल्पनात्मक आराखडा

1.1) प्रस्तावना

1.2) कृषी संशोधनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

1.3) संशोधनाच्या समस्या

1.4) संशोधनाची उद्दिष्टये

1.5) संशोधनाची गृहितके

1.6) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

1.7) अभ्यास पध्दती

1.8) अभ्यास क्षेत्र

1.9) अभ्यास विषयाचे महत्त्व

1.10) साहित्य पुनरावलोकन

2) प्रकरण दुसरे :- (भौगोलिक पाश्र्वभूमी)

2.1) प्रस्तावना

2.2) लातूर जिल्हयाचे स्थान व विस्तार

2.3) लातूर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

2.4) प्राकृतिक रचना

2.5) मृदा

2.6) हवामान

2.7) नदीप्रणाली

2.8) लोकसंख्या

2.9) नैसर्गिक वनस्पती

2.10) जलसिंचन

2.11) वाहतुक व दळणवळण

2.12) लातूर जिल्हयातील उद्योग

3) प्रकरण तिसरे : (कृषी भूमी उपयोजन)

3.1) प्रस्तावना

3.2) भूमी उपयोजन

3.3) जिल्हयातील-तालूकानिहाय भूमी उपयोजनातील बदल

3.4) कृषी भूमी उपयोजन

3.5) पीक आकृतिबंध

4) प्रकरण चौथे :-

लातूर जिल्हयातील डाळ उद्योगधंदयाची स्थापना व विस्तार

4.1) प्रस्तावना

4.2) तालुकानिहाय डाळ उद्योगधंदे

4.3) तालुकानिहाय कृषीवर आधारीत डाळ उद्योगधंद्याचे वितरण

4.4) तालुकानिहाय डाळ उद्योगधंद्याचा तौलनिक अभ्यास

5) प्रकरण पाचवे

लातूर जिल्हयातील डाळवर्गीय पिके आणि उद्योगधंदयातील डाळ उत्पादन

5.1) प्रस्तावना

5.2) डाळवर्गिय पिकांचे प्रकार

5.3) लातूर जिल्हयातील तालूकानिहाय डाळपिकांचे क्षेत्र

5.4) लातूर जिल्हयातील तालूकानिहाय डाळपिकांचे उत्पादन

5.5) लातूर जिल्हयातील उद्योगधंदयातील डाळपिकांचेउत्पादन

6) प्रकरण सहावे :-

लातूर जिल्हा : डाळ उद्योगधंदे आणि आर्थिक विकास

6.1) प्रस्तावना

6.2) आर्थिक विकासाचा अर्थ

6.3) आर्थिक विकासाचे मापन

6.4) डाळ उद्योगांसाठी राबविलेल्या विकास योजनांचा आढावा

6.5) शेतकऱ्यांच्या मुलाखतीतुन प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण

6.6) डाळ उदयोजकांच्या मुलाखतीतून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण

7) प्रकरण सातवे

शेती आणि डाळ उद्योगधंदयाविषयीच्या समस्या व औदयौगिक धोरण

7.1) प्रस्तावना

7.1) डाळ उद्योगधंदयापुढील समस्या व औद्योगीक धोरण

8) प्रकरण आठवे

निष्कर्ष व शिफारशी

8.1) निष्कर्ष

8.2) शिफारशी

संदर्भ सूची :-

1) **कानवटे यु.एस :-** ''नांदेड जिल्हयातील शेतीवर आधारित तेल उद्योगधंदे एक भौगोलिक अभ्यास'' अप्रकाशित पी.एच.डी प्रबंध-2012

2) **मिलिंद भूजबळ, एस.बी.भुजबळ :-** ''गळीत धान्य'', ओमप्रकाशन औंध, पुणे, प्रथम आवृत्ती-2005 पृ.क्र.85

3) **सी.बी.लोंढे :-** ''माळशिरस तालूक्यातील भूमी उपयोग व कृषी उत्पादकता यांचा चिकित्सक अभ्यास'' अप्रकाशित एम .फिल. प्रबंध-2009

4) **Enyedi G.Y :-** Geographical Types of Agriculture-Budapest-Applied Geography in Hungary - 1964

5) **Kendall M.G :-** ''The Geographical Distribution of crop productivity in England'', Journal of The Royal Statistical Society-1939-162 P.Viii

6) **Jasbir Sing :-** ''A New Technique Measuring Agricultural Efficiency in Hariyana- India (The Geographer-Vol-19-1972)''

संशोधक
पाटील गजानन हणमंतराव
(एम.ए.बी.एड्)
मु.पो.गुडसुर ता.उदगीर
जि.लातूर-413517

मार्गदर्शक
प्रा.डॉ.धनुश्वर रमेश शामराव
(एम.ए.बी.एड् पीएच.डी)
भूगोल विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकुर
ता.चाकुर जि.लातूर